# पालक-शिक्षकांची द्वितीय कार्यकारी समिती बैठकीची सूचना
## कार्यकारी समिती - पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल
## २०२०-२०२१

न.:२०-२१/०२
सी.बी.एस.ई मान्यता क्रमांक:- ११३०८३५
शाळेचे नाव: पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल
दिनांक: २७ सप्टेंबर, २०२०

प्रति,
कार्यकारी समितीचे सदस्य

विषय:- कार्यकारी समितीच्या बैठकी बाबत...

प्रिय पालक,

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था(फीचे नियमन), अधिनियम, २०११ (महा८२०१४) च्या कलम ४(२) (ई) च्या तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र शैक्षणिक नियम ८ (१) नुसार वर उल्लेखलेल्या विषयाच्या संदर्भातसंस्था (फीचे नियमन), नियम २०१६, पी आय सी टी मॉडेल स्कूलच्या पालक-शिक्षक असोसिएशनच्या कार्यकारी समितीची बैठक (२०२०-२०२१) शनिवारी, १० ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी १०:३० वाजता मायक्रोसॉफ्ट टीमच्या व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवरुन होणार आहे. आम्ही शुक्रवारी, ९ ऑक्टोबर २०२० रोजी सभेचा लिंक सामायिक करणार आहोत. आपणया सभेसाठी स्वत: उपस्थित राहावे ही विनंती.

सभेची (अजेंडा) विषय पत्रिका जोडली आहे. आपणास वेळेत सभेस उपस्थित राहण्याची विनंती केली जाते. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन), नियम, २०१६ च्या नियम ८ (३) च्या तरतुदीनुसार, एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश सदस्य सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. आणि एकूण पालक सदस्य संखेच्या पन्नास टक्के पालक सदस्य उपस्थिती आवश्यक आहे. सभा पूर्ती साठी आवश्यक असलेली किमान गणसंख्येची पूर्ती न झाल्यास समितीचे अध्यक्ष अर्ध्या तासांसाठी बैठक स्थगित करतील. किमान गणसंख्या नसल्यास, कोणताही विषय सभेत हाताळला जाणार नाही. प्रस्तुत नियमामध्ये नमूद केल्या प्रमाणे सभा रद्द केली जाईल आणि पंधरा दिवसांनी सभा परत बोलवली जाईल.

आपल्या संदर्भासाठी (अजेंडा) विषय पत्रिका खाली जोडली आहे.

पूर्ण वर्षभर आपले सहकार्य लाभावे ही अपेक्षा!

आपली नम्र,
श्रीमती. रमा पुरंदरे
सचिवकार्यकारी समिती
पालक शिक्षक संघटना, पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल, पुणे.

# पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल

*(सी.बी.एस.ई मान्यता क्रमांक:- ११३०८३५)*

## म्हाळुंगे–बालेवाडी, पुणे

पी.आय.सी.टी मॉडेल स्कूलच्या पालक - शिक्षक संघटनेची

द्वितीय कार्यकारी समिति बैठक

२०२०-२०२१

शनिवारी, १० ऑक्टोबर २०२०

१. कार्यकारी समितीच्या सदस्यांचे स्वागत करणे.

२. पालक-शिक्षक संघटनेच्या सभेच्या प्रथमकार्यकारी समितीच्या बैठकीचे मिनिटांचे वाचन करणे.

३. लॉकडाऊन दरम्यान असलेल्या शालेय पायाभूत सुविधा.

४. पहिल्या टर्मच्या ऑनलाईन सत्रांचा आढावा, अभ्यासक्रम, मूल्यांकनव आव्हाने इ.

५. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी फी संबंधी शुल्क

६. आभार.

**************